**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १०९/२०२१ मधील आदेश नि.क्र.३१</u>**

(CNR No. MHSO130001482021)

१. प्रतिवादी (मूळ वादी) यांनी सदरचा अर्ज वादी (मूळ प्रतिवादी नं.२) ने दाखल केलेल्या प्रतिदाव्यास प्रति कैफियत दाखल करण्यास उशीर झाला असून झालेला उशीर माफ करण्यात येवून प्रतिदाव्यास प्रति कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी याकरिता सादर केला आहे. सदर अर्जात प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांची सख्खी जाऊ – सुबाबाई बाबुराव गोंदील ही बरेच दिवस आजारी होती व त्यातच ती मयत झाली. त्यामुळे प्रतिवादी ही यातील वादीचे प्रतिदाव्यास मुदतीत कैफियत व म्हणणे वेळेत / मुदतीत देता आले नाही. त्यामुळे तिचेविरुध्द प्रतिदाव्यास विना कैफियत आदेश झालेला आहे. सबब प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येऊन प्रतिदाव्यास प्रति कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

२. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून त्यात असे कथन केले आहे की, अर्जास हरकत आहे. अर्ज टेनेबल नाही. अर्जातील मागणी कायदेशीर नाही. तसेच अर्जासोबतचे प्रतिकैफियतचे शपथपत्र हे दि.१९/१/२०२२ ला केलेले आहे व हा अर्ज दि.३१/१/२०२२ ला दिला आहे. त्याचेही कारण नमूद नाही. सबब अर्ज रद्द करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करणेचे झालेस कॉस्ट रुपये २०००/– चा आदेश व्हावा.

३. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेचा व निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास वेळेत प्रति कैफियत दाखल केली नाही त्यामुळे झालेला प्रतिदाव्यास विना कैफियत आदेश रद्द होवून त्यांची प्रतिदाव्यास प्रति कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे. सदर दाव्याचे अवलोकन केले असता नि.क्र.२३ वर प्रतिदाव्यास विना कैफियत आदेश पारीत केलेला नाही मात्र प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब याचा विचार करुन सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची प्रति कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीची प्रति कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा व प्रतिदावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या प्रतिदाव्यास प्रति कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी (मूळ वादी) यांनी रक्कम रुपये रु.२००/- (रक्कम रुपये दोनशे) वादी (मूळ प्रतिवादी नं.२) यांना खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी (मूळ वादी) यांनी वादी (मूळ प्रतिवादी नं.२) यांना खर्च दिल्यानंतर त्यांची प्रतिदाव्यास प्रति कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2022.03.03 16:51:30 +0530

बार्शी. (एन. एस. सबनीस)

दिनांकः- ३/३/२०२२ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Shri. N.S.Sabnis<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 3/3/2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 4/3/2022 |